**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संतोष सुरजभान गोयल
३८४ (न्यू)रास्तापेठ, पुणे-४११०११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,
पुणे नागरी समूह, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी क्र.२,
पुणे नागरी समूह, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,
पुणे नागरी समूह, पुणे श्री.आर.के.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी क्र.२,
पुणे नागरी समूह, पुणे श्री.शंकरराव जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.८.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>अपर आयुक्त यांनी फेरतपासणीसाठी अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविलेल्या किती केसेस निर्गत होण्याच्या आहेत, संख्या. अशा केसेस निर्गत करण्याचा साधारण कालावधी किती असतो. दि.१.१.२००० पासून अशा केसेसची संख्या नंबर व शिर्षकासह. अशा केसेस तीन वर्षांपासून निर्गत न होण्याची कारणे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संतोष सुरजभान गोयल यांनी अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी पुणे नागरी समूह, पुणे यांच्याकडे दि.१.१.२००० पासूनच्या व डिसेंबर २००१ ते सप्टेंबर २००५ या काळातील प्रलंबित व फेरतपासणीसाठी परत पाठविलेल्या प्रकरणांबाबतची माहिती दि.२८.२.२००६, दि.२०.३.२००६ अशा दोन अर्जाद्वारे मागितली होती. प्रकरण क्र.६५+४६० एजी यातील कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींची मागणी त्यांनी दि.२३.११.२००६ च्या अर्जान्वये केली होती. पहिल्या दोन अर्जामधील विचारणा प्रश्नार्थक असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, क्र.२, पुणे नागरी समूह यांनी माहिती नाकारली. अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे श्री.गोयल यांनी केलेले अपील त्यांनी अंशतः मान्य केले. कागदपत्रांच्या स्वरुपातील माहिती श्री.गोयल यांना देण्याचा आदेश त्यांनी दिला. अभिलेख पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्याची आपली तयारी होती, असे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, तर आपल्या अर्जाचे स्मरण देऊनही दखल घेतली गेली नाही, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. प्रकरण क्र.६५+४५० एजी हे सहाय्यक नगररचनाकार यांच्याकडील असल्याने त्यांच्या अभिप्रायानुसार श्री.गोयल यांना दि.२१.१२.२००६ रोजी पत्रान्वये समक्ष कागदपत्रे पाहून त्यापैकी हवी असलेली कागदपत्रे उपलब्ध करुन देता येतील, असे कळविण्यात आले. त्यानुसार श्री.गोयल यांनी आवश्यक कागदपत्रांच्या प्रती घेतल्या. मात्र २६.२.२००७ रोजी पुन्हा अर्ज करुन या संचिकेतील सर्व कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली. त्यावेळी मूळ संचिका प्रकरण दि.७.३.२००७ रोजी शासनाकडे पाठविले असल्याचे त्यांना कळविण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह श्री.आर.के.गायकवाड यांनी आयोगाला

दि.१८.१.२००८ रोजी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. मुलगा व वडील यांच्या वादातून उद्‌भवलेला हा विषय असून प्रकरण उच्च न्यायालयात गेले होते. न्यायालयाने निर्णयासाठी ते सक्षम अधिकाऱ्याकडे परत पाठविले. त्यामुळे संबंधित कागदपत्रे शासनाकडे दाखल केली, मात्र त्यापूर्वी त्याच्या प्रती अर्जदाराला देण्यात आल्या होत्या, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी श्री.आर.के.गायकवाड व जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्री.शंकरराव जाधव यांनी नमूद केले.

श्री.गोयल यांनी अर्जात काही मुद्दयांवर खुलासा अथवा भाष्य यांची मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अशी मागणी करता येणार नाही. मात्र प्रश्नार्थक स्वरुपाची विचारणा असल्यामुळे माहिती देता येणार नाही, हे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे चुकीचे आहे. तसे सरसकट म्हणता येणार नाही. प्रश्नाचे स्वरुप लक्षात घेऊनच त्याचा निर्णय करावा लागेल.

शासनाकडे दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्याला द्याव्यात, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार, संबंधित संचिका आपल्या कार्यालयाकडे परत प्राप्त झाल्या असून त्याच्या प्रती उपलब्ध करुन देता येतील, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी श्री.आर.के.गायकवाड यांनी आयोगाला सादर केले व श्री.गोयल यांना दि.३१.१.२००८ रोजी तसे कळविल्याच्या पत्राची प्रत त्यांनी आयोगाला सादर केली.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२३.६.२००८**
जुलै०८-जून३७३९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र जयवंत काटकर
मु.पो.वडजळ, ता.माण, जि.सातारा अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सरव्यवस्थापक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा लेखापरिक्षक अधिन,
विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (जि.म.सह.बँक लि.)सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५+९० / तक्रार /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र जयवंत काटकर
मु.पो.वडजळ, ता.माण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सरव्यवस्थापक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सातारा श्री.ए.एस.नलावडे

**जन माहिती अधिकारी** तथा लेखापरिक्षक अधिन,
विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (जि.म.सह.बँक लि.)सातारा श्री.पी.ए.खटावकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.५.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.५.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित चे कुकुडवाड शाखेच्या संबंधित<br>(१) लेखापरिक्षणाबाबत (अ)बँकेच्या तपासण्या दि.२६.१२.२००३, २७.१२.२००३, २० व २१.१२.२००४ चे तपासणी अहवाल जबाब, स्पष्टीकरण व दोष दुरुस्ती पूर्तता अहवाल. तसेच दि.१७.३.२००५ पर्यंत अर्जदार यांना सूचित केलेले बँकेचे पत्र, (ब) दि.१.४.२००३ ते ३१.३.२००५ या कालावधीचे लेखापरिक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवाल, (क)बँकेचे विभागीय विकास अधिकारी यांनी भेट दिल्याचे अहवाल.<br>(२) बँक शाखा डीडी नं.५४६३९१ व ६४४०२२ चे शाखा डीडी ॲडव्हाईस व पेड ॲडव्हाइसच्या सत्यप्रती<br>(३) अर्जदार यांची डायरी व प्रवास रजिस्टर बरहुकूम वेळा, तारखा, तपशील व शिफारशी आदी मंजूर रकमा दर्शविणारा तारीखनिहाय तक्ता(दि.२९.७.२००३ ते २१.१२.२००४)<br>(४) तपशिलातील बँक मु.का.सातारा परिपत्रके व इतर (अ)जा.नं.देखशेती/१०९४७, दि.२.१२.२००४ चे पत्र व दि.२३.१२.२००४,देवापूर शाखेत हजर होणेसाठी मुकत केलेचे बँकेचे पत्र. (ब)क्र.ईएसटी/९५५६,दि.२५.१०.८३ तसेच सुधारित परिपत्रके क्र.प्रशा ९९-२०००/२६ २२, दि.२२.५.२००३, व प्रशा-२००३-०४/५३२९, दि.३०.७.०३, एसीटी/बीओ/आर सी/१९१७, दि२.३.२००० ची परिपत्रके. (क)दि.१.३.८७ पासूनचे अधिकृत सही वापराबाबतचे मार्गदर्शक परिपत्रक, (ड)तपशीलातील बँकेची पोटनियम पुस्तिका, खातेनिहाय चौकशी नियमावली, बँक शाखा शेड्यूल दि.३१.३.२००४ प्रत,<br>(५) अर्जदाराचे प्रॉव्हिडंट खात्यातील रकमेबाबतची सर्व माहिती.<br>(६) श्री.अरुण नामदेव भिसे यांनी सादर केलेले राजीनामापत्र. पोलीस ठाणे कोरेगाव व म्हसवड यांच्याशी बँकेचे झालेले पत्रव्यवहार व त्यांच्याकडून झालेले पत्रव्यवहार | |

## विवेचन

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कुकुडवार अपहार प्रकरणातील खटल्याच्या अनुषंगाने काही माहिती अपीलकर्ता श्री.रामचंद्र जयवंत काटकर यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. हीच माहिती श्री.काटकर यांनी विशेष लेखा परीक्षक वर्ग-१ यांच्याकडेही

मागितली होती. परंतु ही माहिती आपल्याला दिली गेली नाही, अशी तक्रार श्री.काटकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केली आहे.

आपल्या बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याचे व त्यामुळे श्री.काटकर यांचा अर्ज निकाली काढल्याचे सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सातारा यांनी श्री.काटकर यांना कळविले, तर 'पोलीस ठाण्यात आपल्यावर गुन्हा दाखल झालेला असल्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये एका मुद्याची माहिती देता येणार नाही व ऊर्वरित मुद्यांची माहिती बँकेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून घ्यावी,' असे विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था (जि.म.बँ.म.), सातारा यांनी श्री.काटकर यांना कळविले. श्री.काटकर यानी प्रथम अपील केलेले नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांनी पत्रान्वये स्पष्ट केले.

'श्री.काटकर हे बँकेचे निलंबित अधिकारी असून बँकेच्या कुकुडवार, ता.माण शाखेत झालेल्या रु.९६,७७,२६०.४० च्या अपहाराच्या अनुषंगाने त्यांची खातेनिहाय चौकशी चालू आहे. प्रत्यक्ष रु.१,९९,७७३ इतक्या रकमेच्या कागदपत्रावर / डिमांड ड्राफ्टवर अनधिकाराने सह्या करुन अपहार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. खातेनिहाय चौकशीमध्ये आवश्यक ती सर्व कागदपत्रे दाखल केली असून त्याच्या प्रती श्री.काटकर यांना दिल्या आहेत. तसेच पोलिसांनी तपास करुन दाखल केलेल्या गुन्ह्यात सातारा येथील चीफ ज्युडीशिअल मॅजिस्ट्रेट यांच्या न्यायालयात दाखल असलेल्या दाव्यात आरोपी म्हणून त्यांचा समावेश असून मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ते जामिनावर मुक्त आहेत. तसेच बँकेने त्यांच्याविरुध्द सहकार न्यायालय, सातारा येथे दावा दाखल केला आहे. श्री.काटकर वेगवेगळ्या मंचांकडे अर्ज करुन चौकशीचे काम लांबविण्याचा प्रयत्न करीत आहेत,' असे सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सातारा यांनी दि.२३.८.२००७ व दि.१७.१.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. आपल्या बँकेला कोणत्याही स्वरुपाचे शासकीय सहाय्य प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निधीद्वारे मिळालेले नसल्यामुळे आपली बँक सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या बँकेला लागू होत नाही, असे प्रतिपादन सरव्यवस्थापक

श्री.ए.एस.नलावडे यांनी १७.१.२००८ च्या निवेदनात केले आहे. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.१३.२.२००७ रोजी दिलेले तशा आशयाचे पत्र त्यांनी सोबत जोडले आहे.

विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (जि.म.बँ.म.), सातारा यांच्याकडे मागितलेल्या माहितीसाठी कळविलेले शुल्क श्री.काटकर यांनी भरले नाही, त्यामुळे संबंधित माहिती त्याना पाठविण्यात आली नाही, असे विशेष लेखा परीक्षक, वर्ग-१ यांनी म्हटले आहे.

आपण निरपराध असून बँकेनेच खातेनिहाय चौकशी प्रदीर्घ काळ लांबविलेली आहे. न्यायालयात आपली बाजू मांडण्यासाठी पूरक कागदपत्रे आपल्याला मिळू नयेत. म्हणून आपल्याला माहिती नाकारली जात आहे, असे प्रतिपादन श्री.काटकर यांनी केले.

श्री.काटकर व बँक यांच्यातील वादाबाबतचा निर्णय हा राज्य माहिती आयोगापुढील विषय नाही.

बँकेने लेखा परीक्षण अहवालासह काही माहिती दिली आहे. अन्य देय माहिती दिली जाणे आवश्यक आहे. मात्र श्री.काटकर सातत्याने नवनवे मुद्दे उपस्थित करीत राहिल्यास त्या प्रत्येकानुसार माहिती देणे शक्य नाही, हे सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सातारा श्री.ए.एस.नलावडे यांचे प्रतिपादन रास्त आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, असे सहकार आयुक्तांनी दिलेले पत्र त्यांच्याच दि.८.१.२००६ च्या परिपत्रकाशी विसंगत आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना हा कायदा लागू आहे असे त्यांनी या परिपत्रकात स्पष्टपणे म्हटले आहे. त्यामुळे त्यांचे नेमके खरे मत कोणते, असा प्रश्न उपस्थित होईल. मात्र कर्जांना दिल्या जाणाऱ्या शासकीय हमी, सहकार खात्याचे नियंत्रण, सहकार कायद्यानुसार स्थापना या सर्व बाबींचा विचार करता सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेलाही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो. त्यामुळे या कायद्यांतर्गत मागितलेली देय माहिती बँकेने दिली पाहिजे. श्री.काटकर व बँक यांच्यातील अनुषंगिक पत्रव्यवहार लक्षात घेता बँकेने शुल्क आकारुन माहिती द्यावी.

# आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) बँकेने द्यावयाची राहिलेली देय माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये योग्य ते शुल्क आकारुन अपीलकर्त्यास द्यावी.

(३) विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (जि.म.बँ.म.), सातारा यांनी त्यांच्याकडे मागितलेली व त्यांच्या कक्षेतील माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि.२६.६.२००८

july-०८(june)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश हरी अहिरे
राम हौसिंग सोसायटी, येरवडा, इमारत क्र.३,
गोदावरी प्लॉट नं.७२, आर.टी.ओ.जवळ, पुणे-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक सहकारी संस्था,
कार्यालय नं.२, साखर संकुल, न.ता.वाडी, शिवाजीनगर, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महेश हरी अहिरे
राम हौसिंग सोसायटी, येरवडा, इमारत क्र.३,
गोदावरी प्लॉट नं.७२, आर.टी.ओ.जवळ, पुणे-६

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे-१ श्री.सुनिल के.देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक सहकारी संस्था,
कार्यालय नं.२, साखर संकुल, न.ता.वाडी, शिवाजीनगर, पुणे शहर श्री.एस.पी.चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>(कालावधी सन १९९३ ते सन २००५)<br>नंदनवन बॅकवर्ड क्लास हौसिंग सोसायटी, घोरपडी गाव, रजिस्ट्रेशन नं.पीएमए/एचएसजी /१०४/६२, यांना स.नं.७४बी ही शासकीय जमीन जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश दि.२८.१२.१९९२ रोजी २४ सभासदांना देण्यात आली.<br>या सभासदांनी श्री.नामदेव गणपत मोरे यांच्याकडे जमा केलेली सभासदसंबंधी कागदपत्रे जसे शेअर सर्टीफिकेटस्, रक्कम भरलेली पावती व बँकेची कागदपत्रे, सभासदांची शपथपत्रे, त्यांनी दिलेली राजीनामा पत्रे, दाखल केलेली वारस हक्क संबंधी व वारसहक्क ट्रान्सफर संबंधित कागदपत्रे, शासकीय चौकशी अहवाल संबंधित माहिती व कागदपत्रे जी उपनिबंधक कार्यालय क्र.२ यांच्यातर्फे जमा आहेत | |

## विवेचन

नंदनवन बॅकवर्ड क्लास हौसिंग सोसायटी, घोरपडी गाव, पुणे या संस्थेच्या सभासदांच्या संदर्भात माहिती अपीलकर्ता श्री.महेश अहिरे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कार्यालय नं.२, साखर संकुल, नरवीर तानाजी वाडी, शिवाजीनगर, पुणे शहर यांच्याकडे मागितली होती. परंतु अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री.अहिरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे-१ यांच्याकडे अपील केले. आपल्याला जाणीवपूर्वक अपुरी व चुकीची माहिती दिली, तसेच संस्थेची कागदपत्रे सहकारी न्यायालयात असल्याने व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयातील नसल्यामुळे संबंधित संस्थेकडून अथवा न्यायालयातून ती कागदपत्रे घ्यावीत, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला कळविले. त्याला आपण घेतलेला आक्षेप अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अमान्य केला व अपील फेटाळले म्हणून श्री.अहिरे यांनी दि.११.८.२००६ रोजी लोकआयुक्तांकडे अपील केले. परंतु महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ तेव्हा निरसित झालेला होता व ऑक्टोबर २००५

पासून केंद्रसरकारचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात येऊन राज्य माहिती आयोग गठीत करण्यात आला होता. त्यामुळे लोक आयुक्तांनी श्री.अहिरे यांचे अपील परत पाठविल्यानंतर त्यांनी दि.१०.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. मुदतीत अपील दाखल केलेले नसूनही आयोगाने अपीलकर्त्याचे अपील त्यांच्या विनंतीनुसार दाखल करुन घेतले.

वारंवार विनंती केल्यावर आपल्याला माहिती दिली गेली, तीही पूर्णपणे दिली गेली नाही. आपण दि.१७.१२.२००५ रोजी अर्ज दिला होता व आपल्याला दि.२४.४.२००६ रोजी माहिती दिली गेली. त्यानंतर दि.१९.५.२००६ रोजी काही माहिती दिली गेली. परंतु पूर्ण माहिती दिली गेली नाही. सहकार न्यायालयात कागदपत्रे असल्याचे उत्तर दिले गेले परंतु संस्थेची व सहकार न्यायालयात दाखल झालेली कागदपत्रे उपनिबंधक कार्यालयाने ताब्यात घेणे गरजेचे होते, असे प्रतिपादन श्री.अहिरे व त्यांचे प्रतिनिधी श्री.उमेश लक्ष्मण कांबळे यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. मात्र त्यांचे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कार्यालय नं.२ श्री.एस.पी.चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे-१ श्री.सुनिल के.देशमुख यांनी केले. श्री.अहिरे यांनी माहिती व्यक्तिशः व समक्ष उपस्थित राहून प्राप्त करुन घेणार असल्याचे मूळ अर्जात नमूद केले होते, त्यानुसार माहिती तयार ठेवण्यात आली होती. आपण समक्ष येऊ शकत नसल्याचे त्यांनी दूरध्वनीवरुन दरवेळी कळविल्यानंतर कार्यालयाने टपालाचा दाखला घेऊन दि.३१.१.२००६ रोजी त्यांना समक्ष उपस्थित राहण्याबाबत कळविले. त्यांच्या वतीने श्री.उमेश कांबळे यांनी कागदपत्रांच्या प्रती स्वीकारल्या. अन्य कागदपत्रे नंदनवन हौसिंग सोसायटीशी संबंधित असून ती सहकार न्यायालयात दाव्यात दाखल करण्यात आलेली असल्यामुळे देता आली नाहीत, ती संबंधित न्यायालयाकडून प्राप्त करुन घेण्याबद्दल त्यांना कळविले होते, असे जन माहिती अधिकारी श्री.चव्हाण यांनी लेखी व तोंडी नमूद केले. माहितीच्या व अपिलाच्या संदर्भात श्री.अहिरे स्वत: कधीही उपस्थित राहिले नाहीत, श्री.उमेश कांबळे नावाच्या प्रतिनिधीलाच त्यांनी नेहमी पाठविले. संस्थेच्या संबंधित पत्रव्यवहाराची धारिका अवलोकनासाठी श्री.अहिरे यांना उपलब्ध करुन देण्यात आली होती. वारंवार कळवूनही श्री.अहिरे

उपस्थित राहिले नाहीत. जवळजवळ तीन महिन्यांनी श्री.कांबळे यांनी धारिका पाहून कागदपत्रे नेली, असेही त्यांनी सांगितले. न्यायालयात कागदपत्रे दाखल असल्याचे सांगितले जाते. परंतु न्यायालयाचा निकाल होऊनही वर्षभराहून अधिक कालावधी उलटला आहे. संस्थेवर सहकार खात्याचे प्रशासक असून त्यांनी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. संस्थेकडील व न्यायालयात दाखल केली गेल्याचे सांगितली जाणाऱ्या कागदपत्रांच्या प्रती आपले प्रतिनिधी श्री.उमेश कांबळे यांना द्याव्या, असे लेखी व तोंडी निवेदन श्री.अहिरे यांनी केले.

सहकार खात्याचा प्रशासक संस्थेवर असल्यामुळे सात दिवसात या कागदपत्रांच्या प्रती श्री.अहिरे यांना उपलब्ध करुन द्याव्यात, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार उपनिबंधकांनी सहकार न्यायालयाच्या न्यायाधीशांना दि.२१.१.२००८ रोजी पुढीलप्रमाणे अर्ज पाठविला :

'नंदनवन मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, घोरपडी गांव, पुणे ४११००१ या संस्थेच्या काही सभासदांमध्ये वाद निर्माण झाल्याने आपले न्यायालयात दावे चालू होते. श्री.दत्तात्रय जाधव विरुध्द नंदनवन सहकारी गृहरचना संस्था मर्यादित या दाव्यामध्ये आपल्या न्यायालयात संस्थेचे दप्तर दाखल केलेले आहे. तरी आपल्या न्यायालयात सदर दाव्यामध्ये निकाल लागला असल्याचे समजले आहे. तरी कृपया, दाव्यासंबंधित निकाल लागलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत व संस्थेचे दप्तर परत मिळणेविषयी विनंती आहे'. न्यायालयाकडून सदर दप्तर उपनिबंधक कार्यालयाला दि.५.२.२००८ रोजी प्राप्त झाले. या अभिलेखाचे अवलोकन करुन आवश्यक त्या प्रती निर्धारित शुल्क भरुन घेण्याबाबत जन माहिती अधिकारी श्री.चव्हाण यांनी दि.८.२.२००८ रोजी श्री.अहिरे यांना कळविले. तशी पूरक कागदपत्रे श्री.चव्हाण यांनी सादर केली. त्यानुसार ही वस्तुस्थिती ध्यानी घेता जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रांबाबत दिलेले मूळ उत्तर योग्य होते, तसेच श्री.अहिरे यांना अन्य माहितीबाबत विहित मुदतीत त्यांनी कळविले होते, हे स्पष्ट होते. त्यामुळे जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरत नाहीत.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

# आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) सहकार न्यायालयाकडून प्राप्त करुन घेतलेल्या कागदपत्रांतील अपीलकर्त्यास हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी योग्य ते शुल्क आकारुन अपीलकर्त्यास द्याव्यात.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.६.२००८